आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
८ मे २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे शुभेंदु अधिकारी यांचा उद्या मुख्यमंत्री म्हणून शपथविधी

- तमिळनाडूमध्ये बहुमताचा आकडा जुळवण्यात अभिनेता जोसेफ विजय यांच्या पक्षाला यश

- राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत सुमारे ९३ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण, १७९ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण

**आणि**

- दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल राम्फोसा यांच्या विरोधात महाभियोग चालवण्याला सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये भाजपाच्या विधीमंडळ पक्षाचे गटनेते शुभेंदू अधिकारी यांनी राज्यपाल आर. एन. रवी यांच्याकडे आज संध्याकाळी सत्ता स्थापनेचा दावा सादर केला. उद्या सकाळी ११ वाजता त्यांचा मुख्यमंत्री म्हणून शपथविधी होणार आहे. भाजपा विधिमंडळ पक्षाच्या आज कोलकात्यात झालेल्या बैठकीत त्यांच्या नावावर एकमत झाल्याचं केंद्रीय निरीक्षक या नात्याने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी त्यांनी बंगालच्या मतदारांचे आभार मानले.

**होल्ड - अमित शहा**

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचारात तृणमूल काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हत्या आणि तोडफोडीच्या घटनांची सीबीआय चौकशी करण्याची मागणी तृणमूल काँग्रेसचे नेते सौगत रॉय यांनी केली आहे. न्यायालयाच्या देखरेखीखाली ही चौकशी व्हावी असं रॉय म्हणाले. निवडणुकीचे निकाल

लागल्यानंतर झालेल्या हिंसाचारात पक्षाचे अनेक नेते आणि कार्यकर्ते बळी पडल्याचा दावा रॉय यांनी एका वृत्तसंस्थेची बोलताना केला. शुभेंदु अधिकारी यांचे सचिव चंद्रनाथ रथ यांच्या हत्येचा निषेध करत गेल्या तीन दिवसात तृणमूलच्या तीन कार्यकर्त्यांचीही हत्या झाल्याचं रॉय म्हणाले. या सर्व हत्या भाजप समर्थित गुंडांनी घडवून आणल्याचा आरोपही रॉय यांनी केला आहे.

**<><><><>**

पुदुच्चेरीमधे ऑल इंडिया एनआर काँग्रेस पक्षाचे एन. रंगासामी यांची राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाली. त्यांनी आज राज्यपालांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. एन रंगासामी पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील.

**<><><><>**

तमिळनाडूमधे अभिनेते जोसेफ विजय यांच्या तमिळगा वेत्री कळगम पक्षाला बहुमताचा आकडा गाठण्यात यश आलं आहे. थोड्याच वेळापूर्वी राज्यपालांची भेट घेऊन त्यांनी सत्ता स्थापनेचा दावा सादर केला. काँग्रेस पाठोपाठ त्यांना भारतीय कम्युनिस्ट पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी आणि इंडियन युनियन मुस्लिम लीगने बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे.
विजय यांच्या पक्षाचे १०८, काँग्रेसचे ५ आणि इतर तिन्ही पक्षांचे प्रत्येकी २ आमदार आहेत. त्यामुळं २३४ सदस्यांच्या विधानसभेत त्यांना ११९ आमदारांचा पाठिंबा मिळाला आहे.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारीत घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. राज्यात यावेळी एकूण ९२ पूर्णांक ९ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती मंडळाचे

अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. ऐकूया याची तपशीलवार माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ...

**व्हॉईस कास्ट-**

*(राज्यातून या परीक्षेसाठी एकूण १५ लाख ५५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदाच्या निकालात १७९ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवले आहेत, यात सर्वाधिक १०४ विद्यार्थी लातूर विभागातले आहेत.*

*कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९७ पूर्णांक ६२ शतांश टक्के लागला तर कोल्हापूर विभाग ९५ पूर्णांक ४७शतांश टक्क्यांसह दुसऱ्या स्थानावर आहे. छत्रपती संभाजीनगर विभागाचा निकाल सर्वांत कमी म्हणजे ८८ पूर्णांक ४१ शतांश टक्के लागला आहे. इतर विभागीय मंडळांची उत्तीर्णांची टक्केवारी याप्रमाणे आहे.*

*मुंबई ९४ पूर्णांक ९७ शतांश*

*पुणे - ९४ पूर्णांक २४ शतांश*

*नाशिक ९० पूर्णांक ५३ शतांश*

*नागपूर- ८९ पूर्णांक ७ शतांश*

*लातूर - ८८ पूर्णांक ४२शतांश*

*आणि*

*अमरावती - साडेनव्वद टक्के*

*दहावीच्या निकालात यंदाही मुलींनी बाजी मारली असून ९४ पूर्णांक ९६ शतांश टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत, तर उत्तीर्ण मुलांची टक्केवारी ८९ पूर्णांक ५६ शतांश आहे.*

*यंदा १७९ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवून विशेष यश संपादन केलं आहे. त्यामध्ये सर्वाधिक १०४ विद्यार्थी लातूर विभागातील आहेत.*

*विद्यार्थ्यांना गुणपडताळणीसाठी उद्यापासून येत्या २३ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.*

*शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचं अभिनंदन केलं आहे. -)*

**<><><><><>**

राज्यातल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये पदभरतीत स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यासंदर्भातलं धोरण राज्य शासनाने मंजूर केलं आहे. पदभरती करताना या बँकांनी जिल्ह्यातल्या मूळ रहिवासी अधिवास प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना सत्तर टक्के जागा राखीव ठेवाव्यात. उरलेल्या तीस टक्के जागांवरही जिल्ह्याबाहेरचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर त्या जागाही स्थानिक उमेदवारांमधून भराव्यात असं राज्य सरकारने एका परिपत्रकाद्वारे नमूद केलं आहे.

**<><><><><>**

हन्ता विषाणुशी संबंधित प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने खबरदारीचे उपाय सुरू केले आहेत. अटलांटिक समुद्रात एका जहाजावर हन्ता विषाणू संसर्गाच्या नोंदवलेल्या प्रकरणांच्या सद्यस्थितीवर मंत्रालय बारकाईने लक्ष ठेवून आहे. या जहाजावर असलेल्या दोन भारतीय खलाशांमध्ये कुठलीही लक्षणं दिसून आलेली नाहीत, मात्र त्यांच्या प्रकृतीवर देखरेख ठेवली जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, जहाजावर हन्ता संसर्गबाधित ८ संशयित रुग्ण सापडले. त्यापैकी पाच रुग्णांना हन्ता विषाणूचा संसर्ग झाल्याचं

प्रयोगशाळेच्या अहवालात स्पष्ट झालं असून तीन मृत्यूंचीही नोंद झाली आहे. या विषाणूची मानवाकडून मानवाकडे संसर्ग होण्याची शक्यता मर्यादित असल्याचंही जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केलं आहे. या विषाणूंचा संसर्ग झालेल्या उंदरांमुळे याचा प्रसार होतो.

**<><><><><>**

मंत्री कुंवर विजय शाह यांच्यावर खटला चालवायला मंजुरी देण्याबाबत ४ आठवड्यात निर्णय घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला दिले. ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर लष्करी अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर शाह यांनी आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्या अहवालानंतरही शाह यांच्या विरोधात खटला चालवायला राज्य सरकारनं मंजुरी दिलेली नाही.

**<><><><><>**

स्त्रिया आणि मुलांवरच्या अत्याचार प्रकरणातल्या दोषींना जामीन मिळू नये अशी शिफारस केंद्र सरकारला करणार असल्याचं राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी आज सांगितलं. नुकत्याच घडलेल्या अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर विशेष जलदगती न्यायालये, तज्ज्ञांच्या सहकार्याने योग्य तपास अशा अनेक शिफारशीं महिला आयोग करणार असल्याचं त्यांनी आज नवी दिल्ली इथं सांगितलं.

**<><><><><>**

प्रसिद्ध उद्योगपती रवी पंडित यांचं आज पुणे इथं अल्पशा आजारानं निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते. ते केपीआयटी टेक्नॉलॉजीचे सह-संस्थापक आणि अध्यक्ष होते. व्यवसायाव्यतिरिक्त ते अनेक नागरी, शैक्षणिक आणि धोरणात्मक संस्थांशी संबंधित होते.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल राम्फोसा यांच्या विरोधात महाभियोग चालवण्याला तिथल्या सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. राम्फोसा यांच्यावर भ्रष्टाचाराचे आणि बेकायदेशीरपणे संपत्ती जमवल्याचे आरोप आहेत. यापूर्वी त्यांच्या आस्थापनेत ५ लाख ८० हजार अमेरिकन डॉलर्स आढळल्याचा अहवाल त्यांच्या पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी फेटाळला होता. मात्र आता त्यांना महाभियोगाला सामोरं जावं लागेल.

**<><><><><>**

बल्गेरियाच्या संसदेने आज रुमेन रादेव यांना नवीन प्रधानमंत्री म्हणून मान्यता दिली आहे. युरोपियन महासंघाच्या सदस्य देशातील राजकीय अस्थिरता संपवण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. बल्गेरियाच्या संसदेत रादेव यांना १२७ सदस्यांनी मतदान केलं. ७० सदस्यांनी विरोधात मतदान केलं, तर ३६ सदस्य तटस्थ राहिले. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात देशभरात भ्रष्टाचारविरोधात झालेल्या विविध आंदोलनांमुळे पुराणमतवादी सरकार कोसळलं होतं.

**<><><><><>**

शांघाय इथल्या तिरंदाजी विश्वचषक सामन्याच्या महिला रिकर्व प्रकारात आज भारताच्या सिमरनजीत कौर हिने उपान्त्य फेरीत प्रवेश मिळवला.  पहिल्यांदाच जागतिक स्पर्धा खेळणारी सिमरनजीतने चीन तैपेईच्या फाँग यू झ्यू वर 6-0 अशी मात केली.

तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत काल भारताच्या महिला रिकर्व संघाने दक्षिण कोरियावर मात करत विश्वचषक स्टेज २ मधलं पहिलं पदक पटकावलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्स सोबत नवी दिल्लीत सुरू आहे. नाणेफेक जिंकून कोलकात्याने प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दिल्लीच्या ९ षटकात २ बाद ७७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

इंडोनेशियात माउंट डुकोनो ज्वालामुखीच्या उद्रेकात तीन जणांचा मृत्यू झाला. ही दुर्घटना  आज सकाळी घडली. यात जखमी झालेल्या पंधराजणांवर उपचार सुरु आहेत. प्रतिबंध असलेल्या ठिकाणी गिर्यारोहण करणाऱ्या २० जणांच्या गट या दुर्घटनेत सापडल्यांचं अधिकाऱ्यांनी सांगितली. पर्यटक तसंच गिर्यारोहकांमध्ये लोकप्रिय असलेला,  डुकोनो हा इंडोनेशियातल्या सर्वाधिक जागृत ज्वालामुखींपैकी एक आहे.

**//<><><><><>//**